खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड, जि. पुणे

## राज्यशास्त्र विभाग

दि. २६ नोव्हेंबर २०२१

## अहवाल

## “संविधान गौरव दिन”

साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयामध्ये दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान गौरव दिन covid 19 संदर्भात सर्व शासकीय नियमांचे पालन करून ऑनलाइन व्याख्यानमालेच्या स्वरूपाने साजरा करण्यात आला. संविधान गौरव दिनाचे अवचित्य साधून, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. एस. एल. बुरुड सरांचे संविधान आणि आजचा तरुण या विषयावर online स्वरूपात झूम मीटिंग ॲप व्दारे व्याख्यान आयोजित करण्यात आले सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पी. एस. साळुंखे यांनी केले. तर व्याख्याते परिचय प्रा.एस. जे. पाचारणे यांनी करून दिला. या व्याख्यानामध्ये प्रा. एस. एल. बुरुड यांनी संविधानातील मूलभूत हक्क व मूलभूत कर्तव्य याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच संविधानाप्रती विद्यार्थ्यांची असणारी जागरूकता याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संविधान गौरव दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन देखील करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यार्थ्यांनी संविधाना प्रति आपली भूमिका कशा पद्धतीने बजवावी या संदर्भात महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. सदर कार्यक्रमाचे आभार प्रा. ए. आर. पोखरकर यांनी केले. सदर व्याख्यानास ऑनलाईन स्वरूपात एकूण ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

प्रा.एस.एल.बुरुड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

डॉ.एच.एम.जरे
प्राचार्य